**03.10.2024** प्रभातःमुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो - रावणाचा नियम आहे - आसुरी मत, खोटे बोलणे आणि बाबांचा नियम आहे - श्रीमत, सत्य बोलणे"

प्रश्नः- कोणत्या गोष्टींचा विचार करून मुलांना आश्चर्य वाटले पाहिजे?

उत्तरः- (१) हे कसे बेहदचे अद्‌भुत नाटक आहे की, जी फीचर्स (वैशिष्ट्ये), जी कृती सेकंदा-सेकंदाला होऊन गेली ती पुन्हा जशीच्यातशी रिपीट होणार. किती आश्चर्यकारक आहे की एकाची फीचर्स दुसऱ्याशी मेळ खाऊ शकत नाहीत, (२) कसे बेहदचे बाबा येऊन साऱ्या विश्वाची सद्‌गती करतात, शिकवतात, हे देखील आश्चर्य आहे.

ओम् शांती. रूहानी बाबा शिव बसून आपल्या रूहानी मुलांना शाळिग्रामांना समजावून सांगत आहेत, काय समजावून सांगत आहेत? सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे रहस्य समजावून सांगत आहेत आणि हे समजावून सांगणारे एक बाबाच आहेत बाकीचे तर जे कोणी आत्मे किंवा शाळिग्राम आहेत त्या सर्वांच्या शरीराची नावे आहेत. बाकी एकच परम आत्मा आहेत, ज्यांना शरीर नाहीये. त्या परम आत्म्याचे नाव आहे - 'शिव'. त्यांनाच पतित-पावन परमात्मा म्हटले जाते. तेच तुम्हा मुलांना या साऱ्या विश्वाच्या आदि-मध्य-अंताचे रहस्य समजावून सांगत आहेत. पार्ट बजावण्यासाठी तर सर्व इथे येतात. हे देखील समजावून सांगितले आहे की विष्णूची दोन रूपे आहेत. शंकराचा तर काही पार्टच नाहीये. हे सर्व बाबा बसून समजावून सांगतात. बाबा कधी येतात? जेव्हा नव्या सृष्टीची स्थापना आणि जुन्याचा विनाश होणार आहे. मुले जाणतात - नव्या दुनियेमध्ये एका आदि सनातन देवी-देवता धर्माची स्थापना होते. ते तर परमपिता परमात्म्याशिवाय दुसरे कोणीही करू शकत नाही. तेच एक 'परम-आत्मा' आहेत ज्यांना 'परमात्मा' म्हटले जाते. त्यांचे नाव आहे - शिव. त्यांच्या शरीराचे नाव नसते. बाकी जे कोणी आहेत त्या सर्वांच्या शरीराचे नाव असते. हे देखील समजता की जे मुख्य-मुख्य आहेत ते तर सर्व आलेले आहेत. ड्रामाचे चक्र फिरता-फिरता आता शेवट आला आहे. शेवटी बाबाच पाहिजेत. त्यांची जयंती देखील साजरी करतात. शिवजयंती देखील या वेळी साजरी करतात जेव्हा दुनिया बदलणार आहे, घोर अंधारापासून लख्ख प्रकाश होतो अर्थात् दुःखधामचे सुखधाम होणार आहे. मुले जाणतात - परमपिता परमात्मा शिव एकदाच पुरुषोत्तम संगमयुगावर जुन्या दुनियेचा विनाश आणि नवीन दुनियेची स्थापना करण्यासाठी येतात. आधी नव्या दुनियेची स्थापना, नंतर जुन्या दुनियेचा विनाश होतो. मुले समजतात अभ्यास करून आपल्याला हुषार बनायचे आहे आणि दैवी गुण देखील धारण करायचे आहेत. आसुरी गुण बदलायचे आहेत. दैवी गुणांचे आणि आसुरी गुणांचे वर्णन चार्टमध्ये दाखवायचे असते. स्वतःला बघायचे आहे - मी कोणाला त्रास तर देत नाही ना? खोटे तर बोलत नाही ना? श्रीमताविरुद्ध तर वागत नाही ना? खोटे बोलणे, कोणाला दुःख देणे, त्रास देणे - हे आहेत रावणाचे नियम आणि ते आहेत रामाचे नियम. 'श्रीमत' आणि 'आसुरी मता'चे गायन देखील आहे. अर्धा कल्प आसुरी मत चालते, ज्यामुळे मनुष्य असुर, दुःखी, रोगी बनतात. पाच विकारांचा प्रवेश होतो. बाबा येऊन श्रीमत देतात. मुले जाणतात श्रीमताद्वारे आपल्याला दैवी गुण मिळतात. आसुरी गुणांना बदलायचे आहे. जर आसुरी गुण राहिले तर कमी दर्जाचे पद मिळेल. जन्म-जन्मांतरीच्या पापांचे जे ओझे डोक्यावर आहे ते नंबरवार पुरुषार्थानुसार हलके होईल. हे देखील समजता की आता हे आहे पुरुषोत्तम संगमयुग. बाबांद्वारे आता दैवी गुण धारण करून नव्या दुनियेचे मालक बनतो. तर यावरून सिद्ध होते की जुनी दुनिया जरूर नष्ट होणारच आहे. नव्या दुनियेची स्थापना ब्रह्माकुमार-कुमारींद्वारे होणार आहे हा देखील पक्का निश्चय आहे म्हणून सेवा करत आहेत. कोणा ना कोणाचे कल्याण करण्यासाठी प्रयत्न करत राहतात.

तुम्ही जाणता आपले भाऊ-बहीणी किती सेवा करतात. सर्वांना बाबांचा परिचय देत राहतात. बाबा आले आहेत जरूर अगदी सुरुवातीला थोड्याजणांनाच परिचय मिळेल. मग वृद्धी होत जाईल. एका ब्रह्मा द्वारे किती ब्रह्माकुमार बनतात. ब्राह्मण कुळ तर जरूर पाहिजे ना. तुम्ही जाणता आपण सर्व ब्रह्माकुमार-कुमारी आहोत, शिवबाबांची मुले, सर्व भाऊ-भाऊ आहोत. खरे तर भाऊ-भाऊ आहोत मग प्रजापिता ब्रह्माचे बनल्यामुळे भाऊ-बहीणी बनतो. आणि मग दैवी कुळामध्ये जाऊ तेव्हा नात्यांमध्ये वाढ होत जाईल. या वेळी सर्व ब्रह्माचे

मुलगे आणि मुली आहेत तर एकच ‘कुळ’ झाले, याला ‘घराणे’ म्हणणार नाही. आता राज्य ना कौरवांचे आहे, ना पांडवांचे. घराणे तेव्हा असते जेव्हा राजा-राणी नंबरवार सिंहासनावर बसतात. आता तर आहेच प्रजेचे प्रजेवर राज्य. सुरवातीपासून पवित्र घराणी आणि अपवित्र घराणी चालत आलेली आहेत. देवतांचेच घराणे पवित्र घराणे आहे. मुले जाणतात ५ हजार वर्षांपूर्वी स्वर्ग होता तेव्हा पवित्र घराणे होते. त्यांची चित्रे (प्रतिमा) देखील आहेत, किती आलिशान मंदिरे बनलेली आहेत, बाकी कोणाची मंदिरे नाहीत. या देवतांचीच खूप मंदिरे आहेत.

मुलांना समजावून सांगितले आहे की, बाकी सर्वांच्या शरीरांची नावे बदलतात. यांचेच नाव ‘शिव’ चालत आले आहे. शिव भगवानुवाच, ‘कोणत्याही देहधारीला भगवान म्हटले जात नाही’. बाबांव्यतिरिक्त इतर कोणीही बाबांचा परिचय देऊ शकणार नाही कारण ते तर बाबांना जाणतही नाहीत. इथे देखील बरेच आहेत ज्यांच्या बुद्धीतच येत नाही की बाबांची आठवण कशी करावी. गोंधळून जातात. इतका छोटा बिंदू त्याची आठवण कशी करायची. शरीर तर मोठे आहे, त्याचीच आठवण करत रहातात. असेही गायन आहे - ‘भ्रकुटी के बीच चमकता है सितारा’ अर्थात आत्मा ताऱ्याप्रमाणे आहे. आत्म्याला शाळिग्राम म्हटले जाते. शिवलिंगाची सुद्धा मोठ्या रूपामध्ये पूजा होते. जसे आत्म्याला पाहू शकत नाही, शिवबाबा सुद्धा कोणाला दिसू शकत नाहीत. भक्तीमार्गामध्ये बिंदूची पूजा कशी करणार कारण सर्वात आधी शिवबाबांची अव्यभिचारी पूजा सुरू होते ना. तर पूजेसाठी जरूर मोठी चीज पाहिजे. शाळिग्राम देखील मोठे अंडाकृती बनवतात. एकीकडे अंगुष्ठाकार सुद्धा म्हणतात आणि मग तारा देखील म्हणतात. आता तुम्हाला तर एका गोष्टीवर पक्के रहायचे आहे. अर्धा कल्प मोठ्या आकारामध्ये पूजा केली आहे. आता पुन्हा बिंदू समजणे यामध्ये मेहनत सुद्धा आहे; पाहू शकत नाहीत, हे बुद्धीने जाणावे लागते. शरीरामध्ये आत्मा प्रवेश करते जी मग निघूनही जाते, परंतु कोणी बघू तर शकत नाही. मोठी गोष्ट असेल तर बघता देखील येते. बाबा देखील असे बिंदू आहेत; परंतु ते ज्ञानाचा सागर आहेत, इतर कोणाला ज्ञानाचा सागर म्हणता येणार नाही. शास्त्रे तर आहेत भक्तीमार्गाची. इतकी सारी वेद-शास्त्रे इत्यादी कोणी बनवली? म्हणतात व्यासाने बनवली. क्राईस्टच्या आत्म्याने कोणतेही शास्त्र बनवलेले नाही. ते तर नंतर मनुष्य बसून बनवतात. त्यांना ज्ञान तर काहीच नाही आहे. ज्ञान सागर आहेतच एक बाबा. शास्त्रांमध्ये ज्ञानाच्या, सद्गतीच्या गोष्टीच नाही आहेत. प्रत्येक धर्माचे लोक आपापल्या धर्मस्थापकाची आठवण करतात. देहधारीची आठवण करतात. क्राईस्टचे देखील चित्र आहे ना. सर्वांची चित्रे आहेत. शिवबाबा तर आहेतच परम आत्मा. आता तुम्ही समजता सर्व आत्मे भाऊ-भाऊ आहेत. भावांना ज्ञान नसते, जे ज्ञान इतर कोणाला देतील आणि सद्गती करतील. सद्गती करणारे आहेतच एक बाबा. या वेळी भाऊ देखील आहेत आणि बाबा देखील आहेत. बाबा येऊन विश्वातल्या सर्व आत्म्यांना सद्गती देतात. विश्वाचे सद्गती दाता एकच आहेत. श्री श्री १०८ जगतगुरू म्हणा किंवा विश्वाचे गुरू म्हणा, गोष्ट एकच आहे. आता तर आहे आसुरी राज्य. संगमावरच बाबा येऊन या सर्व गोष्टी समजावून सांगतात.

तुम्ही जाणता खरोखर आता नवीन दुनियेची स्थापना होत आहे आणि जुन्या दुनियेचा विनाश होत आहे. हे देखील समजावून सांगितले आहे पतित-पावन एक निराकार बाबाच आहेत. कोणी देहधारी पतित-पावन असू शकत नाही. पतित-पावन एक परमात्माच आहेत. ‘पतित-पावन सीताराम’ असे जरी म्हटले तरी देखील बाबांनी समजावून सांगितले आहे भक्तीचे फळ देण्यासाठी स्वयं भगवान येतात. तर सर्व सीता आहेत ब्राइड्स (वधू) आणि ब्राईडग्रुम (वर) एक राम, जो सर्वांना सद्गती देणारा आहे. या सर्व गोष्टी बाबाच बसून समजावून सांगतात. ड्रामा अनुसार तुम्हीच पुन्हा ५ हजार वर्षांनंतर या गोष्टी ऐकाल. आत्ता तुम्ही सर्वजण शिकत आहात. शाळेमध्ये किती भरपूरजण शिकतात. हा सर्व ड्रामा बनलेला आहे. ज्या वेळी जे शिकतात, जी कृती होते तीच कृती पुन्हा कल्पा नंतर हुबेहूब होणार, हुबेहूब असेच ५ हजार वर्षांनंतर पुन्हा शिकाल. हा अनादि ड्रामा पूर्वनियोजित आहे. जे काही बघाल सेकंदा-सेकंदाला नवीन गोष्ट दिसेल. चक्र फिरत राहील. नव्या-नव्या गोष्टी तुम्ही बघत रहाल. आता तुम्ही जाणता हा ५ हजार वर्षांचा ड्रामा आहे जो चालतच राहतो. यामध्ये तपशील तर खूप आहेत. मुख्य-मुख्य गोष्टी समजावून सांगितल्या जातात. जसे म्हणतात - ‘परमात्मा सर्वव्यापी आहे’; बाबा म्हणतात - ‘मी सर्वव्यापी नाही’. बाबा येऊन स्वतःचा आणि रचनेच्या आदि-मध्य-अंताचा परिचय देतात. तुम्ही आता जाणता बाबा कल्प-कल्प आम्हाला वारसा देण्यासाठी येतात. हे देखील गायन आहे - ‘ब्रह्मा द्वारा स्थापना’. यामध्ये स्पष्टीकरण खूप चांगले आहे. विराट रूपाचा सुद्धा जरूर अर्थ असेल ना. परंतु हे बाबांव्यतिरिक्त कधीही कोणी समजावून सांगू शकणार नाही. चित्रे तर खूप आहेत परंतु एकाचेही स्पष्टीकरण कोणाकडे नाही आहे. उच्च ते उच्च

शिवबाबा आहेत, त्यांचे देखील चित्र आहे परंतु कोणीही जाणत नाहीत. अच्छा, मग सूक्ष्मवतन आहे ते तर सोडूनच द्या, त्याची आवश्यकताच नाही. इतिहास-भूगोल इथला समजून घ्यायचा आहे, ती तर आहे साक्षात्काराची गोष्ट. जसे इथे यांच्यामध्ये (ब्रह्मा बाबांमध्ये) बाबा बसून समजावून सांगतात तसे सूक्ष्म वतनमध्ये कर्मातीत शरीरामध्ये बसून यांना भेटतात किंवा यांच्याशी बोलतात. बाकी तिथे तर काही जगाचा इतिहास-भूगोल नाही आहे. इतिहास-भूगोल इथला आहे. मुलांच्या बुद्धीमध्ये पक्के झाले आहे सतयुगामध्ये देवी-देवता होते, ज्याला ५ हजार वर्षे झाली. या आदि सनातन देवी-देवता धर्माची स्थापना कशी झाली - हे सुद्धा कोणी जाणत नाहीत. इतर धर्मांच्या स्थापनेबद्दल तर सर्व जाणतात. पुस्तके इत्यादी सुद्धा आहेत. लाखो वर्षांची तर गोष्ट असूच शकत नाही. हे तर अगदी चुकीचे आहे परंतु मनुष्यांची बुद्धी काहीच काम करत नाही. प्रत्येक गोष्ट बाबा समजावून सांगतात - 'गोड-गोड मुलांनो, चांगल्या प्रकारे धारण करा. मुख्य गोष्ट आहे बाबांची आठवण'. ही आठवणीचीच धाव आहे. शर्यत असते ना..., कोणी स्वतंत्र एकटेच धावतात. कोणी जोडीला एकत्र बांधून मग धावतात. इथे जी जोडी आहे ते एकत्र धावण्याचा सराव करतात. विचार करतात सतयुगामध्ये सुद्धा अशी एकत्र जोडी बनावी. भले नाव-रूप तर बदलते, तेच शरीर थोडेच मिळते. शरीर तर बदलत राहते. समजतात आत्मा एक शरीर सोडून दुसरे घेते. फीचर्स तर वेगळी असतील. परंतु मुलांना आश्चर्य वाटले पाहिजे, जी फीचर्स, जी कृती सेकंदा-सेकंदाला घडून गेली त्याची पुन्हा हुबेहूब ५००० वर्षांनी पुनरावृत्ती होणार आहे. हे किती वंडरफुल नाटक आहे, इतर कोणीही समजावून सांगू शकणार नाहीत. तुम्ही जाणता आपण सर्वजण पुरुषार्थ करतो. नंबरवार तर बनणारच. सगळेच काही कृष्ण बनणार नाहीत. सर्वांची फिचर्स वेगवेगळी असतील. किती मोठे वंडरफुल नाटक आहे. एकाची फीचर्स दुसऱ्याशी मेळ खाऊ शकत नाहीत. तोच खेळ हुबेहूब रिपीट होतो. या सर्वांचा विचार करून आश्चर्य वाटायला हवे. कसे बेहदचे बाबा येऊन शिकवतात. जन्म-जन्मांतर तर भक्तीमार्गातील शास्त्रे इत्यादी वाचत आलो, साधूंच्या कथा इत्यादी देखील ऐकल्या. आता बाबा म्हणतात भक्तीची वेळ संपली. आता भक्तांना भगवंताकडून फळ मिळते. हे जाणत नाहीत की भगवान केव्हा आणि कोणत्या रूपामध्ये येईल? कधी म्हणतात - शास्त्रे वाचल्याने भगवान भेटेल; तर कधी म्हणतात - इथे धरतीवर येईल. शास्त्रांनीच जर काम झाले असते तर मग बाबांना का यावे लागते? शास्त्रे वाचल्यानेच भगवान भेटणार असेल तर मग भगवान येऊन बाकी करणार तरी काय? अर्धे कल्प तुम्ही या शास्त्रांचे पठण करता-करता तमोप्रधानच बनत आले आहात. तर मुलांना सृष्टीचे चक्र देखील समजावून सांगत राहतात आणि दैवी वर्तन देखील पाहिजे. एक तर कोणाला दुःख द्यायचे नाहीये. असेही नाही की, कोणाला विष (विकार) पाहिजे, ते दिले नाही तर हे काही दुःख देणे आहे. असे तर काही बाबा म्हणत नाहीत. कितीतरी असे देखील बुद्धू निघतात जे म्हणतात - 'बाबा म्हणतात ना - कोणाला दुःख द्यायचे नाही. आता हे विषाची (विकाराची) मागणी करत आहेत तर त्यांना दिले पाहिजे, नाहीतर हे देखील कोणाला दुःख देणे झाले ना'; असे समजणारे मंदबुद्धी सुद्धा आहेत. बाबा तर म्हणतात - "पवित्र अवश्य बनायचे आहे". आसुरी वर्तन आणि दैवी वर्तन यांची देखील समज पाहिजे. मनुष्य तर हे देखील समजत नाहीत, ते तर म्हणतात आत्मा निर्लेप आहे. काहीही करा, काहीही खा-प्या, विकारामध्ये जा, काही हरकत नाही, असेसुद्धा शिकवतात. कितीतरी जणांना पकडून घेऊन येतात. बाहेर देखील शाकाहारी खूप असतात. नक्की चांगले आहे म्हणूनच तर शाकाहारी बनतात. सर्व जातींमध्ये वैष्णव असतात. घाणेरड्या वस्तू खात नाहीत. अल्पसंख्य आहेत. तुम्ही देखील अल्पसंख्य आहात. या वेळी तुम्ही किती थोडे आहात. हळूहळू वृद्धी होत जाईल. मुलांना हिच शिकवण मिळते - दैवी गुण धारण करा. बाहेर कोणाच्याही हातांनी बनवलेले घाणेरडे पदार्थ खाता कामा नये. अच्छा.

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांशः-

1. १) स्वतःच्या चार्टमध्ये पहायचे आहे - (१) मी श्रीमताच्या विरुद्ध तर चालत नाही ना? (२) खोटे तर बोलत नाही ना? (२) कोणाला त्रास तर देत नाही ना? दैवी गुण धारण केले आहेत?
2. २) अभ्यासासोबतच दैवी आचरण अंगीकारायचे आहे. "पवित्र अवश्य बनायचे आहे". कोणतेही घाणेरडे पदार्थ खायचे नाहीत. पूर्णपणे वैष्णव बनायचे आहे. शर्यत लावायची आहे.

वरदानः- बाबांच्या आज्ञेनुसार बुद्धीला साफ ठेवणारे व्यर्थ किंवा विकारी स्वप्नांपासून मुक्त भव

बाबांची आज्ञा आहे की झोपताना सदैव आपल्या बुद्धीला क्लिअर (साफ) करा, चांगले असो किंवा वाईट; सर्व बाबांच्या हवाली करून आपल्या बुद्धीला मोकळे करा. बाबांना देऊन बाबांसोबत झोपून जा, एकटे नाही. एकटे झोपता किंवा व्यर्थ गोष्टींचे वर्णन करता-करता झोपता तेव्हा व्यर्थ किंवा विकारी स्वप्ने पडतात. हा देखील निष्काळजीपणा आहे. या निष्काळजीपणाला सोडून आज्ञेनुसार चाला तर व्यर्थ किंवा विकारी विघ्नांपासून मुक्त व्हाल.

बोधवाक्य:- नशीबवान आत्मेच सच्च्या सेवेद्वारे सर्वांचे आशीर्वाद प्राप्त करतात.

||| ओम शांती |||